**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. 58/2022 मधील नि.क्र.4 वरील आदेश.**
**सरस्वती खरात वि.संदिप खरात व इतर**

1. अर्जदार क्र. 1 व 2 यांनी प्रस्तूतचा अर्ज घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 चे कलम 23 नुसार अंतरिम आदेश मिळणेकामी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे संक्षिप्त कथन खालील प्रमाणेः—**

2. अर्जदार क्र. 1 ही गैरअर्जदाराची पत्नी असुन अर्जदार क्र.2 हा त्यांच्या लग्नसंबंधातुन जन्मलेला त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र. 1 व गैरअर्जदार यांचा विवाह सहा ते सात वर्षापुर्वी रितीरिवाजानुसार झाला असुन अर्जदाराच्या आईने गैरअर्जदारास सोन्या—चांदीचे दागिने व संसार उपयोगी साहित्य देवून लग्न करुन दिले. अर्जदार क्र.1 व गैरअर्जदार यांचे पतीपत्नीचे नातेसंबंध अद्याप कायम आहेत.

3. अर्जदार क्र. 1 हीला लग्नानंतर तिचे सासरी गैरअर्जदार व त्याचे नातेवाईकांनी दोन ते चार महिने चांगले नांदविल्यानंतर चारचाकी बोलेरो गाडी घेण्यासाठी पाच लाख रुपयाच्या मागणीसाठी शारिरीक व मानसिक त्रास देवून मारहाण करु लागले. तसेच सतत टोचून बोलणे, शिवीगाळ करणे, उपाशीपोटी ठेवून कष्टाची कामे करुन घेवून मारहाण करीत असत तसेच जिवे मारण्याची धमकी देत असत. दरम्यानचे काळामध्ये अर्जदार क्र. 1 हीस मुलगा झाल्यानंतर देखील तिचा त्रास वाढतच गेला आणि दि. 09.10.2022 रोजी पाच लाख रुपयांच्या बेकायदेशीर मागणीपोटी अर्जदाराच्या अंगावरील दागिने काढुन घेवून मुलासह घराबाहेर हाकलून दिले व गैरअर्जदाराने अर्जदारांना तिच्या माहेरी केसापुरी येथे आणुन सोडले आणि जोपर्यत गाडी घेण्यासाठी पाच लाख रुपये आणत नाही तोपर्यत मुलीला सासरी पाठवू नका नाहीतर आम्ही जाळून टाकू अशी धमकी दिली व गैरअर्जदार तेथून निघुन गेला. अर्जदार क्र.1 चे वडील मयत झालेले असल्यामुळे आणि भाउ पत्नीसह वेगळे राहत असुन तिची आई वयोवृध्द असल्यामुळे तिच्या माहेरची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. बाळंतपणामुळे अर्जदार क्र. 1 ची प्रकृति अशक्त असल्यामुळे ती कोणताही कामधंदा करु शकत नाही तसेच गैरअर्जदाराने हाकलून दिल्यापासून तिची कोणत्याही प्रकारची

काळजी घेतलेली नाही.

4. गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबाचे ठाणे व देवीदहीगाव येथे घरे असुन त्यांच्या नावे दहा ते बारा एकर बागायती जमीन आहे. गैरअर्जदार हा चालक असुन राजकारणामध्ये असल्यामुळे त्याने औरंगाबाद येथे दोन प्लॉट घेतलेले आहेत. सदरच्या सर्व उत्पन्नातुन खर्च वजा जाता गैरअर्जदारास दरमहा पन्नास ते साठ हजार रुपये उत्पन्न मिळते. अशाप्रकारे गैरअर्जदारांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. गैरअर्जदाराने दिलेल्या शारिरीक व मानसिक त्रासामुळे अर्जदार खचुन गेली असुन तिला कोणताही कामधंदा होत नाही व आईवडीलांची आर्थिक परिस्थती हालाखीची असल्यामुळे अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता अर्जदार क्र.1 व 2 यांना प्रत्येकी दरमहा पंधरा हजार रुपये पोटगी देण्यात यावी अशी विनंती सदर अर्जाद्वारे केली आहे.

5. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार क्र.1 यास नोटीसची बजावणी करण्यात आल्यानंतर गैरअर्जदार क्र.1 प्रकरणात हजर होवून देखील त्यांचे म्हणणे दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र.1 याचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश करण्यात आला.

6. अर्जदार हिचा युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदार व त्यांचे वकील प्रस्तुत प्रकरणी उपस्थित झाले नसल्यामुळे दि. 17.02.2024 रोजी त्यांच्याविरुध्द युक्तीवाद नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

7. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करुन खालील मुद्दे निश्चीत केले असून त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालील प्रमाणे नमुद केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| 1. | अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | अंशतः होय.<br>अर्जदार क्र.1 व 2 यांना प्रत्येकी रु. 1500/—दरमहा. |
| 2. | आदेश काय ? | ...अंशतः मंजूर. |

**–: कारणमीमांसा :–**

**मुददा क. 1 करीता.**

8. प्रस्तुत प्रकरणी गैरअर्जदार यांनी आपले म्हणणे दिलेले नाही व युक्तीवाद केलेला नाही, त्यामुळे अर्जदार यांचे अर्जामधील कथन आव्हानित झालेले नाही.

9. अर्जदाराच्या सदर विनंती अर्जानुसार मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यत अर्जदार क. 1 व 2 यांना प्रत्येकी प्रतिमाह 15000/– अंतरीम पोटगी अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून मिळावी अशी मागणी केलेली आहे. तरी प्रस्तुत विनंती मान्य करणे किंवा अमान्य करणेकरीता अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान, त्यांच्या दैनंदिन गरजा व गैरअर्जदाराच्या जवाबदा–या यांचा विचार करणे आवश्यक आहे.

10. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार यांनी चारचाकी बोलेरो गाडी घेण्यासाठी अर्जदार क. 1 हिला माहेराहुन पाच लाख रुपये घेवून ये म्हणून शारिरीक व मानसिक त्रास देवून तिला मारहाण केली. तसेच तिला उपाशीपोटी ठेवून वेळोवेळी तिला मारहाण करुन घ ारातुन हाकलून दिले आहे. सदर प्रकरणात गैरअर्जदार याने आपले कोणतेही म्हणणे दिलेले नाही व युक्तीवाद केलेला नाही. त्यामुळे अर्जदार क. 1 हिचा गैरअर्जदाराकडून शारिरीक व मानसिक त्रास झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

11. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार हा तिचा पती अर्जदार क. 2 चा पिता आहे. सदरची बाब आव्हानित नाही. त्यामुळे पती व पिता या नात्याने गैरअर्जदार याने अर्जदारांचा सांभाळ करणे ही त्याची नैतिक जवाबदारी आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदार क. 1 याच्या कुटूंबाची देवीदहीगाव येथे घरे असुन त्यांच्या नावे दहा ते बारा एकर बागायती जमीन आहे. गैरअर्जदार हा चालक असुन राजकारणामध्ये असल्यामुळे त्याने औरंगाबाद येथे दोन प्लॉट घेतलेले आहेत. सदरच्या सर्व उत्पन्नातुन खर्च वजा जाता गैरअर्जदारास दरमहा पन्नास ते साठ हजार रुपये उत्पन्न मिळते असे नमुद केलेले आहे.

परंतू सदर कथनाच्या पुष्ठयर्थ अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत गैरअर्जदार क्र.1 याने किमान मोलमजूरी केली तर तो मोलमजूरीपासून रु.250/– ते 300/– म्हणजेच दरमहा रु.7500/– ते 9000/– कामवितो असा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येईल. त्यामुळे त्याचे उत्पन्न हे अर्जदारांना तात्पुरती आर्थिक मदत देण्यास पुरेसे आहे असा निष्कर्ष निघतो. अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची तरतुद करणे हे गैरअर्जदाराची पती व पिता या नात्याने कर्तव्य व जबाबदारी आहे. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदाराचे उपजीविकेसाठी व दैनंदिन खर्चाकरीता अंतरिम पोटगी म्हणून अर्जदार क्र.1 व 2 यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.1500/–देणे न्यायोचित ठरते असे माझे मत आहे. सबब **मुददा क्र.1 चे उत्तर अंशतः होकारार्थी** देवून मुददा क्र. 2 च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| 1) | अर्ज नि.क्र. 4 अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| 2) | गैरअर्जदार क्र. 1 ने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र. 1 व 2 यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.1500/–(अक्षरी एक हजार पाचशे रुपये फक्त) अंतरिम पोटगी द्यावी असे आदेशित करण्यात येते. |
| 3) | सदर आदेशाची प्रत अर्जदारास, गैरअर्जदार राहतात त्याठिकाणचे संरक्षण अधिकारी यांना घरगुती हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 चे कलम 24 नुसार मोफत देण्यात यावी. |
| 4) | सदरचा आदेश खुल्या न्यायालयात आदेशित करण्यात आला. |

सही/–
( सौ.आर.एस.गोसावी )
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग माजलगाव.

माजलगाव.
दिनांक : 17/02/2024